आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

विषय: मळीच्या परराज्यातील निर्यातीस आयुक्तांची पूर्व मान्यता घेण्याबाबत.....

---

परिपत्रक

क्र.मळी.११.२००१/१२३१०/५-अ

मुंबई, ६ ऑगस्ट २००१.

महाराष्ट्र हे मळी व मद्यार्कांबाबत अधिक्य (surplus) असणारे राज्य असल्याने इतर गरजु राज्यात व परदेशात मळीची निर्यात करण्यावर निर्बंध लावण्यात येत नाहीत. निर्यात केलेले मद्यार्क निर्यातीच्या राज्यात पोचल्याचे दाखले प्राप्त करुन घेण्याच्या तरतुदी संबंधित नियमात आहेत. मात्र अशा तरतुदी मळी निर्याती संदर्भात नाहीत. सध्या निर्यात होणाऱ्या मळीचा दुरुपयोग टाळण्याच्या दृष्टीकोनातुन दक्षता घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. तसेच या वर्षी पुढील वर्षी मळीचे अपेक्षित उत्पादन कमी होण्याची शक्यता विचारात घेऊन व निर्यात होणाऱ्या मळीचा दुरुपयोग टाळण्याच्या दृष्टीकोनातुन मळी निर्यातीबाबत पुढीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे. सदर कार्यपध्दती दि.१६.८.२००१ पासुन अंमलात येईल. हे परिपत्रक प्राप्त होण्यापूर्वी मंजुर केलेल्या निर्यात परवान्यावरील मळीच्या निर्यातीसही पुढील सूचना लागू रहातील.

१. परराज्यातील आयातदाराने सक्षम प्राधिकरणाने मंजुर केलेला मळी आयातीचा आयात परवाना निर्यातीच्या परवानगी अर्जासोबत आयुक्त कार्यालयात सादर करावा.

२. ज्या साखर कारखान्यातुन मळीची उचल करावयाची आहे त्या साखर कारखान्याचे मळी विक्रीस आयात करणाऱ्या घटकास संमती दिल्याबाबतचे संमतीपत्र तसेच सदर साखर कारखान्यातुन संबंधित ऊस गाळित हंगामात उत्पादित केलेली मळी, राज्यात केलेली विक्री, परराज्यात राज्यनिहाय केलेली विक्री व शिल्लक मळी तसेच कारखान्यात उपलब्ध असलेली मळी साठवणुकीची व्यवस्था उदा.स्टील टाक्यांची संख्या व त्यांची क्षमता, पक्का व अच्छादित पाट इत्यादी बाबतची माहिती सादर करावी लागेल.

३. आयात परवान्याची वैधता व साखर कारखान्याची संमती तसेच दाराची विश्वासार्हता विचारात घेऊन आयुक्त कार्यालय गुणव-तेवर परवानगी देईल.

-- २ --

४. आयुक्तांनी परवानगी दिलेल्या घटकासच व साखर कारखान्यासच मळीची निर्यात करण्यास जिल्हाधिकारी मुंबई मळी नियमावली १९५५चा नियम १४ ते १७ मधील तरतुदींची पूर्ततेनंतर परवाने मंजुर करतील.

५. परराज्यातील सदर घटकास निर्यात केलेली मळी निर्यातीच्या ठिकाणी पोचल्याचे पुरावे सादर केल्याखेरीज पुन्हा मळी निर्यातीची आयुक्तालयामार्फत परवानगी देण्यात येणार नाही.

६. परदेशात निर्यात होणा-या मळीकरिता उपरोक्त निर्बंध लागू रहाणार नाहीत.

ज्या जिल्ह्यातुन मळीची निर्यात सध्या सुरु आहे त्या जिल्हयाच्या अधीक्षकांनी उपरोक्त कार्यपध्दती संबंधित साखर कारखान्यांच्या व परराज्यातील घटकांच्या तात्काळ निदर्शनास आणावी तसेच वर नमुद केलेल्या तारखेनंतर उपरोक्त पध्दतीचा अवलंब करुनच मळी निर्यातीस परवाने मंजुर करावेत. महाराष्ट्रातुन मळीची निर्यात होणा-या शेजारच्या सर्व राज्यांच्या आयुक्तांच्या निदर्शनास उपरोक्त कार्यपध्दती या कार्यालया मार्फत निदर्शनास आणण्यात येत आहे.

या परिपत्रकाची पोच सर्व अधीक्षकांनी संबंधित विभागीय उप आयुक्तांना पाठवावी.

(सही)

(ए.रामचंद्रन)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति

१. ज्या जिल्हयात साखर कारखाने आहेत त्या सर्व जिल्हाधिका-यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना अग्रेषित.
विभागीय उप आयुक्तांनी या परिपत्रकाच्या प्रती ज्या अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रातील साखर कारखाने आहेत त्या अधीक्षकांना फॅक्सद्वारे तात्काळ निर्गमित कराव्यात.
३. ज्या जिल्हयात साखर कारखाने आहेत त्या जिल्ह्याच्या सर्व अधीक्षकांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित. अधीक्षकांनी परिपत्रकातील उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी तंतोतंत व काटेकोरपणे करण्याची दक्षता घ्यावी.

(सही)
(रा. नि. गावडे)
उप आयुक्त,
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

MOLASSES
PORT

क्र. मळी. ११२००१/१०६१/स.आ.३ नागपूर दि. २६-८-२००१

सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभाग भंडारा यांना माहिती व त्वरित कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी सदर परिपत्रकाची पोच या कार्यालयास सादर करावी.

(सही)
विभागीय उप आयुक्त
राज्य उत्पादन शुल्क
नागपूर विभाग नागपूर